# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ■ रंजित पाटील कव्हेकर यांच्या हस्ते आफान शेख यांचा सत्कार ■

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ९ मे :** लातूर तालुक्यातील कव्हा गावचा भूमिपुत्र व शहरातील कृपासदन इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी आफान रफियोद्दिन शेख याने इयत्ता १० वी बोर्ड परीक्षेमध्ये १०० टक्के गुण घेऊन दैदिप्यमान यश मिळविलेले आहे. त्याबद्दल जेएसपीएम शिक्षण संस्थेचे कार्यकारी संचालक रंजित पाटील कव्हेकर यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी पालक रफियोद्दिन शेख, महादेव पिटले, सौरभ राठोड आदी उपस्थित होते. यावेळी गुणवत्तेबद्दल बोलताना आफान शेख म्हणाला, माझी मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि वडिलांचे सहकार्य यामुळे हे उल्लेखनिय यश मिळाले असून भविष्यामध्ये गुणवत्तेच्या आधारे डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार करणार असल्याचा विश्वास त्याने बोलताना व्यक्त केला.

रंजित कव्हेकर यांनी यावेळी आफान चे कौतुक करून भविष्यात ती निश्र्चित आपले स्वप्न पूर्ण करेल,असा विश्र्वास व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी जिद्दने आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करून चालल्यास ते आफानच्या या यशाबद्दल त्याचे शहर व परिसरातून कौतुक होत आहे.



# विविध वृत्त...

## आपण समस्त लातूरकरांच्या वतीने आज लातुरात सार्वजनिक श्रद्धांजली सभा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ९ मे :** लातूरच्या सार्वजनिक जीवनातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व, 'लातूर पॅटर्न'चे आधारस्तंभ आणि माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन वाहण्यासाठी रविवार, दि. १० मे २०२६ रोजी आपण समस्त लातूरकरांच्या वतीने 'सार्वजनिक श्रद्धांजली सभेचे' आयोजन करण्यात आले आहे

अजातशत्रू व्यक्तिमत्वाचे धनी असलेले डॉ. गोपाळराव पाटील यांनी हे लातूरचे पहिले बालरोगतज्ज्ञ म्हणून त्यांनी वैद्यकीय सेवेचा श्रीगणेशा केला. केवळ एक डॉक्टर म्हणूनच नव्हे, तर एक आपुलकीचा माणूस म्हणून त्यांनी हजारो कुटुंबांना आधार दिला. आज संपूर्ण देशात छएएढ आणि गएए परीक्षेत राजर्षी शाहू महाविद्यालयाचे विद्यार्थी जे यश संपादन करत आहेत, त्या यशाचा पाया डॉ. गोपाळराव पाटील यांच्या दूरदृष्टीमुळे रचला गेला. त्यांनी सुरू केलेला 'शाहू पॅटर्न' पुढे जगप्रसिद्ध 'लातूर पॅटर्न' म्हणून ओळखला गेला. लातूरला शिक्षणाची पंढरी बनवण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

भारतीय जनता पक्षाचा विचार जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचवून पक्ष संघटना मजबूत करण्यात त्यांनी आयुष्य वेचले. त्यांच्या या निस्वार्थ कार्याची पावती म्हणून त्यांना 'राज्यसभेचे खासदार' म्हणून कार्य करण्याची संधी लाभली.'लॉयन्स क्लब'च्या माध्यमातून त्यांनी सेवाकार्याचा जो ठसा उमटवला, तो आजही सामाजिक कार्यकर्त्यांसाठी दीपस्तंभ आहे. अजातशत्रू नेतृत्व आणि नि:स्पृह समाजसेवक अशी त्यांची ओळख कायम राहील. अशा या बहुआयामी नेतृत्वाच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी रविवार, दि. १० मे रोजी सकाळी ९ वाजता दयानंद महाविद्यालय सभागृहात सार्वजनिक श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन आपण समस्त लातूरकरांच्या वतीने करण्यात आले आहे.

## राजमाता जिजामाता विद्यालयाचा ८५ टक्के निकाल




**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ९ मे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १०वी परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. यात राजमाता जिजामाता विद्यालयाने उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली असून विद्यालयाचा निकाल ८५ टक्के लागला आहे.

अक्षरा गुलाबराव राऊत ही विद्यार्थिनी ९५.२० टक्के गुण मिळवून विद्यालयातून प्रथम, रोहिणी बालाजी कांबळे ९३.८० टक्के गुण मिळवून द्वितीय, तर प्रताप दादाराव किर्जत ८९ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. विद्यालयातील ६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून २४ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. तर गणित विषयात रोहिणी बालाजी कांबळे या विद्यार्थिनीला ९७ गुण प्राप्त झाले आहेत.

या यशाबद्दल शिक्षक आमदार विक्रम काळे, शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, शिक्षण उपसंचालक दीपक चवणे, संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, मुख्याध्यापक संगमेश्वर केंद्रे, संस्था सदस्य उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, करिश्मा केंद्रे, पर्यवेक्षक एस. एम. गुरमे, समन्वयक राजीव मुंढे, पांडुरंग कुलकर्णी, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर आदींनी कौतुक केले आहे.

## तुळजाभवानी विद्यालयाचा ८० टक्के निकाल



**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ९ मे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १०वी परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला आहे. यात तुळजाभवानी माध्यमिक विद्यालयाने उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली असून विद्यालयाचा निकाल ८० टक्के लागला आहे.

राहिल रियाज बागवान याने ७८.२० टक्के गुण मिळवून विद्यालयातून प्रथम, आदिती बालाजी राठोड हिने ७२.४० टक्के गुण मिळवून द्वितीय, तर पूनम भरत भंडारवाड हिने ७२ टक्के गुण मिळवून विद्यालयातून तृतीय आली आहे.

या यशाबद्दल शिक्षक आमदार विक्रम काळे, शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, शिक्षण उपसंचालक दीपक चवणे, संस्थेच्या सचिव के. ए. जायेभाये, प्राचार्य डी. एन. केंद्रे, सहसचिव मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, व्ही. व्ही. लोहारे, शिवकुमार चिकले आदिंनी कौतुक केले आहे.

## वाले इंग्लिश स्कुलचा एस. एस. सी. परीक्षेत १००% निकाल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. ९ मे :** नुकत्याच जाहीर झालेल्या इ.१०वी च्या निकालात वाले इंग्लिश स्कुलचे ८६ विद्यार्थी बसले होते व ते सर्व उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले. ३१ विद्यार्थ्यांना ९०% च्या पुढे गुण असून देशमुख सिध्दिराज १००% गुण घेऊन प्रथम आला. तर काळे कादंबरी किरण ९९.८०% गुणांसह द्वितीय आणि शेख माझ ९९.६०% गुण घेत तृतीय आला, देशमुख वेदांतिका ९८.६०% गुणांसह चौथी तर निटूरे हिमांशू ९८.००% गुणांसह पाचव्या स्थानी आला. ५५ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह (७५% - ९०%) उत्तीर्ण झाले आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव मकरंद सावे, कोषाध्यक्ष शांतीकुमार कुचेरिया, सदस्य शिवशंकर बिडवे, झकीखान कायमखानी, संदीप सावे, सौ. ममता सावे, प्राचार्य भोगडे सर, उपप्राचार्य बाकलीकर सर, पर्यवेक्षिका सौ. धाराशिवकर मॅडम, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारीवृंदाने अभिनंदन केले.

# हाय रे दुर्दैव.. ! अतिक्रमण हटावचा फार्स चालणार तयारी किती काळ.. ?

## लातूर शहरातील गंज गोलाईतील अतिक्रमण कायमस्वरूपी हटणार तरी केव्हा ?

**तभा वृत्तसेवा**



**लातूर, दि. ९ मे :** लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने जणू ठराविक काही महिन्यांच्या अंतरानंतर शहराचा आत्मा समजल्या जाणाऱ्या गंज गोलाईमधील अतिक्रमण हटविण्याचा फार्स केला जातो. पुढे जसजसे अतिक्रमण काढले जाते, तसतसे ते पुन्हा टप्प्याटप्प्याने बसविले जाते हा आजपर्यंतचा लातूरकरांचा अनुभव आहे. मागच्या चार दिवसापूर्वीही अतिक्रमण हटाव चा फार्स असाच केला गेला. आता पुन्हा एकदा गोलाईला टप्प्याटप्प्याने पूर्ववत अतिक्रमणाचा विळखा पडल्याचे पाहावयास मिळणार आहे. त्यामुळे सुजाण लातूरकरांतून हे अतिक्रमण कायमस्वरूपी कधी हटविण्यात येणार आहे ? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात असल्याचे ऐकायला मिळत आहे. अतिक्रमण नेहमीसाठी हटवायचे असेल तरच मनपा प्रशासनाने यापुढे प्रयत्न करावेत,अशा प्रकारचा फार्स करू नये, अशा भावनाही नागरीकातून व्यक्त होताना दिसत आहेत.

लातूर शहर महानगरपालिकेच्या आयुक्तपदी मानसी मीना या आयएएस अधिकारी तर उपायुक्त पदी वसुधा फड कार्यरत आहेत. आयुक्तांची लातुरात नव्याने नियुक्ती झाली असली तरी वसुधा फड यांनी यापूर्वीही लातूर शहर मनपात कर्तव्य बजावले आहे. त्यांना लातूरच्या कार्यपद्धतीचा चांगला अनुभवही आहे. एक कुशल प्रशासकीय महिला अधिकारी असा त्यांचा लौकिकही राहिला आहे. लातूरमध्ये काम केल्यामुळे येथील गोलाईतील अतिक्रमण कायमस्वरूपी काढण्यासाठी प्रत्यक्षात काय केले पाहिजे, याचाही त्यांना अभ्यास आहे. चार दिवसापूर्वी त्यांनी जेव्हा गंज गोलाईतील अतिक्रमण हटविण्याचा विषय हाती घेतला, तेव्हा काही मंडळींनी त्यांचा ' लेडी सिंघम' असाही उल्लेख केल्याचे पाहायला मिळाले. दोन्ही महिला अधिकारी लातुरातील गंज गोलाईतील अतिक्रमण काढण्याचा प्रयत्न करत आहेत, हे पाहून सुरुवातीला प्रत्येकाला आनंदच वाटला. मात्र, जुन्या - जाणत्या अनुभवी मंडळींना हे अतिक्रमण किती दिवसांपेक्षा नव्हे तर किती तासांकरिता काढले जाईल ? या प्रश्नाने भंडावून सोडले होते. अखेर अनुभवींचेच बोल खरे ठरल्याचे एकंदर परिस्थितीवरून दिसून येत आहे.

अतिक्रमण हटाव मोहिमेनंतर अवघे काही तासच गंज गोलाईतील रस्त्यांनी मोकळा श्र्वास घेतला असावा. त्यानंतर हळूहळू, जसे काही अतिक्रमण हटवण्याचा प्रयत्न मनपा प्रशासनाकडून केला गेला, असे दाखवून देण्यासाठी अतिक्रमण हटाव मोहीम राबविली गेली.

पुन्हा पहिले पाढे पंचावन्न झाल्याचे पदोपदी निदर्शनास येत आहे. हा प्रकार मागच्या अनेक वर्षांपासून सुरु आहे. अतिक्रमणाने लातूरकरांना खूप त्रास होतो . परंतु सामान्य नागरिकांचे भ्रष्ट प्रशासन आणि स्वार्थी राजकीय नेत्यांपुढे काहीच चालत नाही, हे वास्तव आहे. नेत्यांनी आणि मनपा प्रशासनाने प्रामाणिकपणे अतिक्रमण हटविण्याचे ठरविले तर हा केवळ काही तासांचा उपक्रम असणार आहे. परंतु दुर्दैवाने आजपर्यंत तसे झाल्याचे दिसून येत नाही. म्हणून तर लातूरचे वैभव समजल्या जाणाऱ्या गंज गोलाईला अजूनही अतिक्रमणाच्या विळख्यात दिवस कंठावे लागत आहेत. गंज गोलाई कायमस्वरूपी अतिक्रमण मुक्त झाल्याचे केव्हा पाहायला मिळेल ? या प्रतिक्षेत लातूरचे नागरिक अनेक वर्षांपासून आहेत.

# चित्रवार्ता



नियमित वर्दळ असलेल्या गांधी चौकात उन्हामुळे तुरळक वाहतूक दिसत आहे.




वेग आवरा आयुष्य सावरा याची जनजागृती करताना छ.शिवाजी महाराज चौकात आरटीओ उभी केलेली मोडकळीस असलेली बाईक



गंज गोलाई मध्ये कायम ऑटो चालकांची मनमानी पाहायला मिळते. स्वत:च्या तंद्रित चालणाऱ्या या मंडळींना आपल्यामुळे इतरांना त्रास

# उदगीर पोलीस प्रशासनाच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात २२५ रक्तदात्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**




**लातूर, दि. ९ मे :** उदगीर शहर व उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण २२५ रक्तदात्यांची यावेळी ऐच्छिक रक्तदान केले.

लातूर पोलिसांनी सामाजिक बांधिलकी, मानवतेची जाणीव आणि रस्ते सुरक्षा जनजागृती यांचा अनोखा संगम साधणारा भव्य रक्तदान उपक्रम उदगीर येथे मोठ्या उत्साहात पार पडला. उदगीर शहर पोलीस स्टेशन व उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, इंडियन रेडक्रॉस सोसायटी संचलित डॉ. भालचंद्र ब्लड सेंटर, लातूर तसेच रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन यांच्या सहकार्याने दि. ८ मे २०२६ रोजी उदगीर शहर पोलीस स्टेशन येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आणि एक हेल्मेट एक जीवन या सामाजिक संदेशावर आधारित आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने मोफत हेल्मेट देऊन सन्मानित करण्यात आले. रक्तदानासोबतच रस्ते सुरक्षेचा महत्त्वपूर्ण संदेश देणाऱ्या या अभिनव उपक्रमास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

विशेष म्हणजे, लग्नसराईचा हंगाम आणि विविध सामाजिक कार्यक्रमांची व्यस्तता असताना- ही तब्बल २२५ नागरिकांनी रक्तदान करून सामाजिक उत्तरदायित्वाचे उत्तम उदाहरण घालून दिले. सकाळी ८ वाजल्यापासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू असलेल्या या शिबिरात युवक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच विविध क्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला.

लातूर जिल्हा पोलीस दल हे केवळ कायदा व सुव्यवस्था राखणारे यंत्रणाच नसून सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या आरोग्य, सुरक्षितता व जनजागृतीसाठी सातत्याने पुढाकार घेत असल्याचे या उपक्रमातून पुन्हा अधोरेखित झाले. या रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी उदगीर शहर पोलीस स्टेशन, उदगीर ग्रामीण पोलीस स्टेशन, इंडियन रेडक्रॉस सोसायटी संचलित डॉ. भालचंद्र ब्लड सेंटर, लातूर, रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन तसेच सर्व पत्रकार बांधव,स्वयंसेवक, रक्तदाते व सहकार्य करणाऱ्या नागरिकांचे विशेष अभिनंदन करण्यात येत आहे.

## पंडित नेहरू विद्यालयाचे घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा**

**उदगीर दि. ९ मे :** जवाहरलाल नेहरू विद्यालय ,तोगरी ता. उदगीर जि.लातूर, १० बोर्ड परीक्षेच्या निकालाची उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली असून शाळेचा एकूण निकाल ९४.८४% निकाल लागला असून त्यात २३ विद्यार्थी विशेष प्रावीण्य सह उत्तीर्ण झाले, ३० विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले व ३१ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले . तसेच केंद्रातून प्रथम कु कांचन गोकुळ तेलंग ९३%, द्वितीय कु विजयालक्ष्मी रामेश्र्वर पाटील ९२.२०% व तृतीय स्थानावर दोन विद्यार्थिनी कु स्नेहा राजकुमार ८६.८०% व कु वेदिका विश्र्वनाथ निडेबने ८६.८०%गुण घेऊन विशेष मुलींनी बाजी मारली आहे.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा सौ शांतम्मा पंडीतराव पाटील ,सचिव श्रीमती इंदुमती मनोहरराव येरनाळे कार्याध्यक्ष श्री महेश मनोहरराव येरनाळे ,प्राचार्या सौ.वंदना महेश येरनाळे,उपप्राचार्य गुणवंत काळगापुरे, पर्यवेक्षक लक्ष्मण लोभाजी, केंद्र प्रमुख श्री रऊफ सय्यद व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून अभिनंदन करण्यात आले.

# खून प्रकरणात तीन आरोपींना जन्मठेप

## उदगीरच्या अतिरिक्त सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ९ मे :** लातूर जिल्ह्यातील उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गंभीर खून प्रकरणात उदगीरच्या अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्या. डी. बी. म्हालटकर यांनी महत्त्वपूर्ण निकाल देत तीन आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, उदगीर ग्रामीण पोलीस ठाणे येथे सदरील गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणातील फिर्यादी जनाबाई बाळासाहेब बिरादार, रा. दैठणा ह.मु. हेर ता. उदगीर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तपासाची दिशा निश्र्चित करण्यात आली होती. पोलिसांनी वरिष्ठांचे मार्गदर्शनात व सूचनेनुसार अतिशय बारकाईने गुन्ह्याच्या तपास करून साक्षीदारांचे जबाब,आरोपीविरुद्ध भरपूर परिस्थितीजन्य व भौतिक पुरावे गोळा करून आरोपी बालाजी माधव जगताप वय ६० वर्षे, लहु बालाजी जगताप वय २५ वर्षे व अंकुश बालाजी जगताप वय २२ वर्षे, सर्व रा. हेर ता. उदगीर. यांच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते.

खटल्याच्या सुनावणीअंती न्यायालयाने तिन्ही आरोपींना जन्मठेप व प्रत्येकी एक हजार रुपये दंड, दंड न भरल्यास एक महिना अतिरिक्त कारावास अशी शिक्षा सुनावली.

या प्रकरणाचा तपास तत्कालीन तपास अधिकारी पोलीस निरीक्षक दिपकुमार वाघमारे यांनी वरिष्ठांचे मार्गदर्शनात अत्यंत बारकाईने व शास्त्रोक्त पद्धतीने केला. न्यायालयीन कामकाजात पैरवी अंमलदार पोलीस अमलदार ए. एस. शेख यांनी प्रभावी समन्वय साधला.

सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता एस. एम. गिरवलकर यांनी सक्षम युक्तिवाद करून आरोपींविरुद्धचे ठोस पुरावे प्रभावीपणे न्यायालयासमोर मांडले. त्यांच्या प्रभावी युक्तिवादामुळे आरोपींना कठोर शिक्षा होण्यास मदत झाली. गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये काटेकोर तपास, सक्षम पुरावे व प्रभावी न्यायालयीन पाठपुरावा यामुळे दोषींना शिक्षा मिळवून देण्यात लातूर जिल्हा पोलीस दल सातत्याने यशस्वी ठरत असल्याचे या निकालातून अधोरेखित झाले आहे.

# लातूर शहरात 'महाराजस्व अभियान' उत्साहात

## विविध शासकीय योजनांचा २ हजार नागरिकांनी घेतला लाभ

**तभा वृत्तसेवा**




**लातूर दि. ९ मे :** महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत लातूर शहरासाठी गिरवलकर मंगल कार्यालय येथे समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे, प्रभारी गटविकास अधिकारी सतीश चोरमले, नगरसेवक सतीश साळुंके आणि फिरदोस अरीफ शेख-साकोळकर यांच्यासह विविध विभागांचे तालुकास्तरीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिरामध्ये एकूण १२ विभागांचे स्टॉल्स उभारण्यात आले होते, ज्याद्वारे नागरिकांना विविध शासकीय सेवा आणि योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली. यामध्ये संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत प्रलंबित बँक केवायसी पूर्ण करण्यासोबतच नवीन अर्जांसाठी मार्गदर्शन करण्यात आले, तर पुरवठा विभागामार्फत डिजिटल रेशन कार्डचे वाटप आणि दुरुस्तीबाबत माहिती देण्यात आली. महसूल विभागाने नागरिकांना जिवंत व डिजिटल सातबाराचे विनामूल्य वाटप केले, तसेच रहिवासी, उत्पन्न आणि जातीच्या प्रमाणपत्रांचे नवीन अर्ज स्वीकारले. भूमी अभिलेख विभागामार्फत लातूर मंडळातील ७ गावांचे नकाशे संबंधित ग्रामपंचायतींना सुपूर्द करण्यात आले असून पी.आर. कार्ड आणि मोजणीबाबत माहिती देण्यात आली.

कृषी विभागाने पी.एम. किसान, महाडीबीटी आणि 'महाविस्तार--ख' प यांसारख्या आधुनिक योजनांची माहिती दिली, तर आरोग्य विभागाने आयोजित केलेल्या विशेष कॅम्पमध्ये रक्ताची व रक्तदाब तपासणी करण्यासोबतच 'आयुष्मान भारत' आणि 'महात्मा फुले जन आरोग्य' योजनेविषयी माहिती देण्यात आली. महावितरण विभागाने 'मागेल त्याला सोलर' आणि 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज' योजनेसाठी नागरिकांकडून अर्ज भरून घेतले. महिला व बाल विकास विभागामार्फत लेक लाडकी योजना, प्रधानमंत्री मातृवंदना योजना आणि बेबी केअर किटबाबत मार्गदर्शन करून गरोदर मातांना आहार योजनेची माहिती देण्यात आली. याशिवाय घरकुल योजना आणि वन विभागाच्या योजनांचे स्टॉल्सही नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले. एकूण १६५ लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले, शहरातील सुमारे २ हजार नागरिकांनी या अभियानात सहभाग नोंदवला. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवासी नायब तहसीलदार गणेश सरोदे यांनी केले.

# यशवंत विद्यालयाचे घवघवीत यश

## (१००% चे १० विद्यार्थी तर ९५ टक्के ५२ विद्यार्थी.)

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर दि. ९ मे :** येथील यशवंत विद्यालयाने दहावी बोर्ड परीक्षेत यंदा अभूतपूर्व यश संपादन करत आपली उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. शाळेचा एकूण निकाल तब्बल ९८.५० टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुणवत्तेचे प्रदर्शन केले आहे.

यंदाच्या निकालातील विशेष बाब म्हणजे तब्बल १० विद्यार्थ्यांनी शंभर टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. शंभर टक्के गुण प्राप्त करणारे विद्यार्थी असे वैष्णवी फड, उत्कर्ष धामणगावकर, दिपाली अंभोरे, नैतिक उगिले, सृष्टी उपासे, संध्याराणी भगनुरे, मुकुंद केंद्रे, रुचिता तुळजापूरकर, सुप्रिया मुंढे आणि सतीश हंगरगे आदिनी १०० टक्के गुण घेऊन यश संपादन केले आहे. तसेच साधना बेधडे (९९.८०), ऋतुजा ढाकणे (९९.६०), मुकुंद केंद्रे (९९.६६), अर्जुन वळसे (९९.२०), माधुरी मुंढे (९९.२०), वैष्णवी मुंढे (९९.००), विष्णुप्रिया पाटील (९८.८०), यश डुडुरे (९८.८०), वैष्णवी नागरगोजे (९८.६०), मानसी बेद्रे (९८.६०), स्नेहल बिलापट्टे (९८.६०), प्रथमेश मोरे (९८.४०), प्रतीक उगीले (९८.००), श्रावणी बडगिरे (९८.००), जय काडवदे (९७.८०), अक्षरा रोकडे (९७.६०), श्रेयश सावरगावकर (९७.६०), सर्वांगी कोसलगे (९७.४०), यश नागरगोजे (९७.२०) आणि आदित्य तेलंगे (९७.२०) यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले.

या परीक्षेत ९५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणारे ५२ विद्यार्थी, तर ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणारे ९८ विद्यार्थी असून त्यांनी शाळेच्या यशात मोलाचा वाटा उचलला आहे.

या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे असल्याचे मुख्याध्यापकांनी सांगितले.